Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

Peer Reviewed-Referred & Indexed Journal

February - 2020 Special Issue – 240 (B)

## Analysis of Maharashtra State Legislative Assembly Election 2019



**Executive Editors :**

Dr. Sandip Tundurwar
(HoD, PG Dept. of Political Science)
Shri. Binzani City College, Nagpur

Dr. Vakil Shaikh
(HoD, Dept. of Political Science)
Taywade College, Mahadula-Koradi, Dist.-Nagpur

**Chief Editor :**

Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

**Associate Editors :**

Dr. Sanjay Nakade
(HoD, Dept. of Political Science)
Dnyanesh Mahavidyalaya, Nawargaon

Dr. Balasaheb Jogdand
(PG Dept. of Political Science)
Sitabai Arts & Commerce College, Akola

Dr. Amar Bondre
(Dept. of Political Science)
VMV Com. JMT Arts & JJP Sci. College, Nagpur

Dr. Dinkar Chaudhari
(HoD, Dept. of Political Science)
Arts & Commerce College, B[illegible]si

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)

...ional Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625,
...ssue 240 (B) : Analysis of Maharashtra State Legislative Assembly 2019
Peer Reviewed-Referred Journal
ISSN : 2348-7143
February-2020

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | लेखक/लेखिका | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ चे विश्लेषण : एक दृष्टीक्षेप | डॉ. राजेंद्र बेलोकार | 08 |
| 2 | निवडणूक आयोग आणि महाराष्ट्राची चौदावी विधानसभा निवडणुक विश्लेषण | महेंद्र भगत | 12 |
| 3 | विश्लेषण–महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे | डॉ. संतोष डाखरे | 15 |
| 4 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ : विश्लेषण व निरीक्षण | डॉ. आनंद शिंदे | 21 |
| 5 | विधानसभा निवडणूक – २०१९ एक विश्लेषण | डॉ. राजेश्री कडू, डॉ. अश्विनी खापरे | 27 |
| 6 | २०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालाचा अन्वयार्थ | प्रा. कल्पना निंबार्ते | 31 |
| 7 | १४ वी विधानसभा निवडणूक : जनादेशाचा अन्वयार्थ | डॉ. अनंत आवटी | 36 |
| 8 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ ''खंडित जनादेश'' – विश्लेषण | डॉ. ममता पाथ्रीकर | 42 |
| 9 | १४ वी विधानसभा : खंडित जनादेश | डॉ. प्रशांत विघे | 46 |
| 10 | महाराष्ट्रातील विधानसभा सभेच्या निवडणूका व भवितव्य | प्रा. बबीता थुल | 51 |
| 11 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक – २०१९ मध्ये वंचित बहूजन आघाडी, डावे, दलित, शेकाप, जनसुराज्यपक्ष व ए.आय.एम.आय.एम. या पक्षाची कामगिरी | डॉ. छाया देशमुख | 58 |
| 12 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक विश्लेषण २०१९ निवडणूक रणनीती आणि डावपेच | डॉ. संगिता सोमवंशी | 64 |
| 13 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ विश्लेषण राजकीय स्थित्यंतरे आणि रणनीती व डावपेच | डॉ. प्रफुल्ल राऊत | 67 |
| 14 | १४ व्या महाराष्ट्र विधानसभेतील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रतिनीधीत्व | प्रा. शशिकांत पाटील | 72 |
| 15 | नव युवा आमदार आणि युवा मतदार : एक चिकित्सक अध्ययन (महाराष्ट्र विधानसभा २०१९ च्या संदर्भात) | डॉ. प्रतिभा टावरी | 79 |
| 16 | वंचित बहुजन आघाडी : वाटचाल व भवितव्य | डॉ. हिराचंद वेस्कडे | 85 |
| 17 | राजकीय पक्षांच्या उमेदवारीचे निकष आणि भूमिका | प्रा. विनोद मुडे | 89 |
| 18 | महाराष्ट्र विधानसभा निवडणुका व राजकीय पक्षाची भूमिका | डॉ. राजेंद्र झाडे | 95 |
| 19 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ : प्रमुख राजकीय पक्षांचे जाहीरनामे एक विवेचन | प्रा. एकनाथ मुरकुटे | 98 |
| 20 | निवडणुका आणि मतदारवर्तन | श्री. बंडु शेरके, डॉ. राजेंद्र मुद्दमवार | 103 |
| 21 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक : कलम – ३५६ आणि राज्यपालाची भूमिका | डॉ. संदीप बी. काळे | 107 |
| 22 | राज्याच्या शांसन व्यवस्थेत राज्यपालाची भूमिका | डॉ. हरीदास लाडके | 112 |
| 23 | राजकीय पक्षाच्या उमेदवारीचे निकष | राजेंद्र कुळमेथे | 114 |
| 4 | राजकीय पक्षाच्या उमेदवारीचे निकष | प्रा. प्रभाकर डोळस | 122 |
| 5 | सत्तासंघर्षात मित्र–तत्व, जनमताचा बळी... | डॉ. बा. रा. कत्तुरवार | 124 |
| | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक | डॉ. सरला मेश्राम | 127 |
| | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ चे विश्लेषणात्मक विवेचन | डॉ. प्रिया बोचे | 130 |

# महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ चे विश्लेषणात्मक विवेचन

**प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे**
सं. भ. वा. कला महाविद्यालय, सिंदखेडराजा, जि. बुलढाणा

**महाराष्ट्र विधानसभा २०१९**

| | |
|---|---|
| भा.ज.पा. | १०५ |
| शिवसेना | ५६ |
| कॉंग्रेस | ४४ |
| राष्ट्रवादी कॉंग्रेस | ५४ |
| म.न.से. | ०१ |
| वंचित बहुजन आघाडी | ०० |
| अन्य | २८ |
| N/A | ०० |
| एकुण | २८८/२८८ |

**सत्तेचे समिकरणासाठी आवश्यक स्पष्ट (बहुमत १४८)**

१) १०५+ ५६ शिवसेना = १६१ स्पष्ट बहुमत

२) ५६ शिवसेना + ५४ राष्ट्रवादी कॉंग्रेस + ४८ कॉंग्रेस + १३ अपक्ष = १६९ स्पष्ट बहुमत नं. १ चे समिकरणात युती होऊ शकली नाही व नं. २ चे सत्तेतील समिकरण सत्तारूढझाली. त्याचे विश्लेष्णात्मक विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल. माझ्या या मताला सर्व कोणी सहमत असेलच असे नाही.

सन १९९९ पासुन आजपर्यंतची निवडणुकांचा आढावा घेता, गेल्या २५ वर्षात भाजपा पक्षाचा स्ट्राईक रेट १७ टक्क्याने वाढला. मत टक्क्यात मात्र सुमारे १० टक्क्यापर्यंतची वाढझालेली आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ ही एक निवडणूक संपुर्ण राजकारणाला नवीन कलाटणी देणारी ठरली आहे. प्रत्येकाला व्यक्ती, पक्ष, संघटना व जनता सर्वांना आपले महत्व काय, याची जाणीव या निवडणुकीने करून दिली. प्रत्यक्ष निवडणूक व त्यानंतर येणारे परिणाम हे वाखाणण्याजोगे राहिले. मतदाराने प्रत्येकाला आपली जागा दाखवून दिली आणि त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे पक्षांतर करणाऱ्यांना चांगला धडा शिकविला. राजकारण हे जातीचे, पक्षाचे, व्यक्तीचे, घाराणेशाहीचे नसुन ते विकासाचे आहे, हे मतदाराने सकीय पक्षांना दाखविले. राष्ट्रवादासारख्या मुद्दयांवर स्थानिक प्रश्नांनी मात या निवडणुकीत केली. राष्ट्रीय स्तरावरील निवडणुकीत कलम ३७० किंवा कोट हल्ला, राममंदिर या सारखे मुद्दे गाजले जातात, त्यावेळी स्थानिक मुद्दयांना फार महत्व नसते. सर्वशक्तिमान जोखिम पत्करणारा नेता अशी मोदींची प्रतिमा असल्याने मोठया राज्यातही भाजपाला भरघोश यश मिळेल, असे त्यांना वाटले आणि तसाच राष्ट्रवादी फार्म्युला भाजपाने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत वापरण्यात प्रयत्न केला. परंतु सामुहिक हित, स्थानिक विध्वंस, जातीय गटबंधन, भिषण ओला व सुखा दुष्काळ, घराणेशाही हे सर्व मुद्दे राष्ट्रीय भावनिक मुद्दयांवर भारी पडले. उदा. परळी मतदार संघातून अमित शहा यांनी भाजपाच्या

ISSN : 2348-7143
February-2020

महाराष्ट्रातील विधानसभा प्रचारासाठी सुरूवात केली. प्रचाराचा मुद्दा कलम ३७०, पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ नरेंद्र मोदींनी प्रचारसभा घेतली. त्यानींही प्रचार सभेत राष्ट्रीय मुद्दे मांडले. परंतु भिषण दुष्काळाची झळ सोसणाऱ्या परळीतील मतदारांनी पंकजा ताईना नाकारले. तसेच साताऱ्यातील लोकसभा निवडणुकीतही घराणेशाहींची शेखी मिरविणे भाजपाला महागात पडल्याचे चित्र दिसते. एकुणच काय तर स्थानिक प्रश्नांना महत्व देणाऱ्याकडे मतदारांचा कौल दिसतो.

लोकसभा निवडणुकीत प्रचंड मताधिक्क्याने भारतीय जनता पक्षाची सरकार केन्द्रात पुन्हा सत्तेत आली. तशीच त्यांच्यात एक उन्मादी आकांक्षा निर्माण झाली. न्याय संस्थेपासुन रिझर्व बॅंकेपर्यंत आणि सी.बी.आय. पासुन निवडणुक आयोगापर्यंत व इतरही सर्व संस्थांवर केन्द्रातले भाजपा सरकार आपले नियत्रंण अधिकच घट्ट करू पाहत आहे. ३७० कलम रद्द करून आपण एक ऐतिहासीक काम केले, आता आपल्याला कुणीही अडविणार नाही, असा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झाला. देशाची आर्थिक व्यवस्था डोलायमान असतांना सुध्दा त्याकडे दुर्लक्ष करून लोंकाना बोचणारे प्रश्न प्रचारांत न घेता आपलेच राजकारण लादण्याचा प्रयत्न ते करू लागले आणि अशातच महाराष्ट्राच्या निवडणूका लागल्या. महाराष्ट्र एका टोकाला जातो की काय, अशी भीती वाटत असतांना महाराष्ट्रात मुळचे विवेकी मन जागृत झाले आणि महाराष्ट्राचा गुजरात होणार नाही, असा स्पष्ट इशाराही या निवडणुकीने दिला.

निवडणुकीच्या आधीची परिस्थिती लक्षात घेता. निवडणुकीतून कोणत्या प्रकारे का होईना सत्ता भाजपाकडे कशी राहिल. याची मोर्चेबांधणी करून मतदारांना आमच्याशिवाय पर्यायच नाही असे सगळे चित्र उभे करण्यास भाजप यशस्वी झाले. विरोधी पक्ष विखुरलेला, त्यांच्यात राजकीय चैतन्याचा अभाव, विरोधकांचे सुमारे २५ आमदार सत्ताधारी पक्षांनी फोडले. अनेकांना पक्षात घेतले. ई.डी., सी.बी.आय. ची भिती घालुन विरोधकांना निष्प्रभ करण्याचा प्रयत्न चालु केला. सत्ताधारी पक्षाकडे अतोनात पैसा आहे. त्याचा वापर ते मुक्तपणे करू लागले, वृत्तपत्र आणि प्रसार माध्यमांना विकत घेतले जात होते किंवा धमकाविल्या तरी जात होते. या विधानसभा निवडणुकीचा अन्वेयार्थ का आणि ह्या निकालामुळे महाराष्ट्राचे पुढचे राजकारण काय असेल ? हा प्रश्न निवडणुकीतुन आला.

आपल्या समोर कोणी विरोधकच नाही किंवा आपल्याला कोणाचे आव्हानच नाही. असे दाव करणाऱ्या सत्ताधारी भाजपाला या निवडणुकीव्दारे मतदारांना चांगलेच नामोहरण केले. आम्ही २२० पार करू असे म्हणणाऱ्यांचा रथ कधी जनतेने दलदलीत घातला, हे कळले सुध्दा नाही. राष्ट्रीय पातळीवर वाईट अवस्था असलेल्या, कॉंग्रेस हा पर्याय असल्याने तेथे भाजपाची सुध्दा सत्ता टिकूण राहिली, म्हणुन राज्य पातळीवरही आपणांस आव्हाण देणारे कोणीही नाही, असा नाहक भ्रम भाजपा पक्षाने केला आणि तेथेच त्यांची चुक झाली. कारण विरोधक हा व्यक्ती किंवा पक्ष असे भौतिक रूपी असायला हवे असे भाजपाला वाटले. परंतु विरोधा ही संकल्पना आहे आणि तो प्रथम माणसाच्या मनात जन्माला येते हे तो विसरला आणि मतदारांनी ज्यास धडा शिकवायचा त्याच्या विरोधात अलका सलका उमेदवार जरी उभा राहिला तरी जनता त्या पाठींबा देईल. कारण देशाच्या निवडणुकांचा इतिहास हे दर्शवितो. पण भाजपास याचा विसर पडला आणि मतदारांनी त्यांना निवडणुकीच्या माध्यमातून ही आठवण करून दिली. एक प्रकारे नैतिक अरेरावी त्यांनी निर्माण केली. एकवेळी मतदारांनी ती मान्यही केली असती, परंतु आर्थिक आणि औद्योगीक आघाडीवर विकास ठप्प नोकऱ्या नाहीत, औद्योगीक गुंतवणूक नाही आणि तरी आपण म्हणू ते मतदारांनी मान्य करावे, हे धोक्याचे ठरले. केन्द्रातील यशाने भाजप नेते आपण म्हणु तिच दिशा पुर्व असे वर्तन करू लागले. परंतु मतदारांनी वेळीच शहानपणा

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 240 (B) : Analysis of Maharashtra State Legislative Assembly 2019
Peer Reviewed-Referred Journal
ISSN : 2348-7143
February-2020

दाखविल्यावरून ही निवडणुक एकाअर्थी लोकशाहीचा विजयच ठरली, असे या निकालावरून दिसते. त्याचप्रमाणे शिवसेना या पक्षास सुध्दा मला मोठा इशारा मतदारांनी दिला. या पक्षाने आतातरी आपण स्वकर्तत्वावर काही करू शकतो हे जनतेस दाखवून दयावे, कारण सत्तेत राहायचे आणि वर विरोधी भुणभुण लावायची असा हास्यास्पद वर्तनावर मतदारांनी खिळ घतली. याशिवाय मनसे या पक्षाने नेतृत्वावर अधिक भर दिला असला तरी पक्ष पाठिंब्यासाठी नेता महत्वाचा आहे. परंतु तरी तो सर्व भुमिका पार पाडु शकत नाही. त्यास कार्यकर्ते आवश्यक आहेतच, फक्त निवडणुकींखेरीज चांगला कार्यक्रम जनतेस दयावा लागतो, हे पक्षाने या निकालावरून लक्षात घेण्यासारखे आहे. राष्ट्रवादी या पक्षाचा विचार केला तर या पक्षासनिवडणुकांआधी काही भवितव्य आहे, असे वाटत नव्हते. परंतु शरद पवार यांच्या जिद्दीने व कष्टाने या निवडणुकांचे चित्र बदलले व परिणामानंतर सत्येचे समीकरण बदलविले. शरद पवारांना निवडणुकीच्या तोंडावर सक्त वसुली संचालनाची नोटीस पाठवून सरकारने चुक केली. परंतु पवार साहेबांनी या कार्यवाहीचे स्वत:साठी सोने केले आणि अमलबजावणी कार्यालयावर चाल करत सरकारला एक पाउल मागे घ्यायला भाग पाडले. हा या विधानसभा निवडणुकीचा कलाटणीक्षण पवारांनी खेचुन आणला व भाजपाचा विजयरथ थांबवून धरला, हे मतदारांनी भाजपाच्या दुहेरी राजकारणाविरूध्द दिलेले मतपत्र आहे. कॉंग्रेस पक्षाने तर हया निवडणुकीत काहीही कामगिरी दाखविली नाही. फक्त कॉंग्रेसचे नेते एकमेंकाच्या उखळया पाकळया काढण्यात दंग होते. सर्व सोडुन या पक्षाने आता जोमाने काम संरू करणे आवश्यक आहे.

सत्तेत असाल तर माजु नका आणि नसाल तर तुम्हास सत्ता का दयावी, या मतदाराच्या प्रश्नांचे उत्तर आपल्या कामातून देत राहा. यातून योग्य तो बोध घेत जे जमीनीवर येतील ते टिकतील. हाच या विधानसभा निवडणुकींच्या निकालाचा अन्वयार्थ आहे. महाराष्ट्रा इतका उघडपणे जाती पातीच्या विव्देवाच राजकारण आपलस करणार नाही, हे जगाच्या लक्षात आले. या निवडणुकीने भारतीय जनता पक्षाला बहुमत तर दिले, परंतु त्यांना एक स्पष्ट इशारा दिला की, केवळ दिल्लीहून इथे राजकारण राजकारण करता येत नाही. लोकांचे मुलभुत प्रश्न न सोडविता, निव्वळ राष्ट्रवादी, राष्ट्रभक्ती याने जनता गप्प बसणार नाही. त्यांना त्यांचे जगण्याचे, प्रगतीचे प्रश्नही महत्वाचे आहेत. हे समजून घेउन पुढील राजकारण करावे लागेल. जातीपातीच्या दलदलीत जावून परांवलंबी आणि दिल्लीसमोर गुडघे टेकण्याच्या रस्त्याला महाराष्ट्र लागतो की काय असे वाटत होते. परंतु या निकालामुळे हयाला अडथळा निर्माण झाला. महाराष्ट्र अजुन पुरता जाग व्हायचा आहे. संधी निर्माण झाली आहे आणि राजकारणाची पुन्हा मांडणी करण्याचा अवकाश या निवडणुकीतून मिळाला आहे.

हया निवडणुकीच्या माध्यमातून भाजपाला झटका बसला वगैरे ठिक आहे. पण म्हणून काही कॉंग्रेसला किंवा अन्य कोणत्या पक्षाला मतदारांनी विश्वासपात्र मानले असेही झाले नाही. हे पक्ष जोवर विरोधासाठी विरोध करीत राहतील, तोवर केवळ भाजप अश्यक्य झाला किंवा भाजपाचे चुकले, याचाच फायदा त्यांना थेडा बहुत मिळत राहिल. त्याचे सकारात्मक समर्थन करता येणार नाही. देशाला लोक केन्द्री कृती कार्यक्रम देणारे पक्ष हवे आहेत. नेतृत्वाचा विश्वासाचा चेहरा हवा आहे. हे दोन्ही दिल्याशिवाय विरोधातील पक्षांना जनादेश मिळू शकणार नाही. आज देशाला केवळ विरोधी पक्ष नको आहे. समर्थ असा प्रतिपक्ष हवा आहे.